RNI NO. MAHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ७ वे, अंक नं. : ९८

दि.०७ ऑगस्ट २०२६, वार : शुक्रवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

दैनिक

# महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990

# ओपीडी, आयपीडी, ऑपरेशन पुन्हा सुरु होणार, अखेर डॉक्टरांचा संप मागे

**मुंबई/प्रतिनिधी :** मोठी बातमी समोर येत आहे, अखेर मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर एमएआरडीकडून निवासी डॉक्टरांचा संप मागे घेत असल्याची घोषणा करण्यात आली आहे. डॉक्टरांनी संप मागे घेतल्यामुळे आता पुन्हा एकदा नियमितपणे ओपीडी, आयपीडी आणि नियोजित शस्त्रक्रिया, तसेच प्रयोगशाळा सेवा, फिव्हर ओपीडी आणि शैक्षणिक उपक्रम पुन्हा सुरू होणार आहेत. मात्र जरी संप मागे घेतला असला तरी देखील सीसीएमपी पात्रता असलेल्या डॉक्टरांची महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलमध्ये नोंदणी करण्याच्या प्रस्तावाला अजूनही एमएआरडीचा विरोध कायम आहे. याच विरोधात आज निवासी डॉक्टरांकडून संप पुकारण्यात आला होता. त्यानंतर सरकार आणि प्रतिनिधींमध्ये चर्चा करून तोडगा काढण्याचे आदेश उच्च न्यायालयाने दिले होते.

मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर अखेर आता एमएआरडीकडून संप मागे घेण्यात आला आहे. यामुळे पुन्हा एकदा नियमितपणे ओपीडी, आयपीडी आणि नियोजित शस्त्रक्रिया, तसेच प्रयोगशाळा सेवा, फिव्हर ओपीडी आणि शैक्षणिक उपक्रम पुन्हा सुरू होणार आहेत. डॉक्टरांनी संप मागे घेतल्यामुळे रुग्णांना मोठा दिलासा मिळाला आहे. दरम्यान न्यायालयाच्या आदेशाचा सन्मान राखत जरी संप मागे घेतला असला तरी, इतर कायदेशीर व लोकशाही मार्गाने आंदोलन सुरूच ठेवणार असल्याचा इशारा एमएआरडीकडून देण्यात आला आहे.

उच्च न्यायालयाने काय म्हटलं होतं?

उच्च न्यायालयाने संपाच्या पार्श्वभूमीवर निवासी डॉक्टरांची बाजू मांडणाऱ्या वकिलांची देखील कानउघडणी केली होती. रुग्णांचे हाल होत आहेत, हे तुम्हाला छान वाटतं का? असा सवाल न्यायालयाने संपांची घोषणा केलेल्या डॉक्टरांना विचारला होता. तसेच तुम्ही संप मागे घ्या, तुम्ही जर संप मागे घेतला तर आम्ही तुमची बाजू लवकरात लवकर ऐकू असंही मुंबई उच्च न्यायालयाने म्हटलं होतं. दरम्यान मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर आता डॉक्टरांनी आपला संप मागे घेतला आहे. डॉक्टरांनी आपला संप मागे घेतल्यामुळे रुग्णांना मोठा दिलासा मिळाला आहे. पुन्हा एकदा सर्व प्रकारच्या वैद्यकीय सेवा सुरळीत सुरू होणार आहेत.



## 'डोह'कार श्रीनिवास विनायक कुलकर्णी यांना उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांची श्रद्धांजली

**मुंबई/प्रतिनिधी :** ज्येष्ठ साहित्यिक, 'डोह'कार श्रीनिवास विनायक कुलकर्णी (श्री.वि.) यांच्या निधनाने मराठी साहित्यविश्वातील एक संवेदनशील, अभ्यासू आणि व्रतस्थ साहित्यिक हरपल्याची शोक भावना उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी व्यक्त केली आहे. शोकसंदेशात उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार म्हणतात, श्री.वि. कुलकर्णी यांनी आपल्या सूक्ष्म निरीक्षणशक्ती, निसर्गप्रेम आणि जीवनातील साध्या अनुभवांना असामान्य साहित्यिक अभिव्यक्ती देत मराठी ललित साहित्य समृद्ध केले. डोह, मनातल्या उन्हात, सोन्याचा पिंपळ, पाण्याचे पंख आणि कोरडी भिक्षा यांसारख्या साहित्यकृतींनी मराठी वाचकांच्या मनावर कायमचा ठसा उमटवला. 'मौज' या प्रतिष्ठित नियतकालिकाचे संपादक म्हणून त्यांनी अनेक नवोदित साहित्यिकांना व्यासपीठ उपलब्ध करून दिले आणि मराठी साहित्याच्या समृद्ध परंपरेला नवे आयाम दिले. साहित्यावरील त्यांची निष्ठा, संवेदनशीलता आणि साधेपणा भावी पिढ्यांसाठी कायम प्रेरणादायी राहील.

श्री.वि. कुलकर्णी यांच्या निधनाने मराठी साहित्य क्षेत्राची कधीही भरून न निघणारी हानी झाली असल्याची शोक भावना व्यक्त करत उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी त्यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे.

## राज्यपालांच्या हस्ते अनंत कान्हेरे यांचेवरील पुस्तकाचे प्रकाशन

**मुंबई/प्रतिनिधी :** 'अनंत कान्हेरे : द बुलेट दॅट अवोक भारत' या क्रांतिकारक अनंत कान्हेरे यांच्या जीवनावरील इंग्रजी अनुवादित पुस्तकाचे प्रकाशन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या हस्ते लोकभवन मुंबई येथे संपन्न झाले. अनंत कान्हेरे यांच्यावरील प्रा. डॉ. म. बा. कुलकर्णी यांच्या मूळ मराठी पुस्तकाचा सदर पुस्तक अनुवाद आहे. देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात सत्याग्रह चळवळीसोबतच क्रांतिकारी राष्ट्रवादाची एक प्रभावी विचारधारा होती. या क्रांतिकारकांचे स्वातंत्र्यलढ्यातील योगदान अपेक्षित प्रमाणात गौरविले गेलेले नाही. अशा अज्ञात क्रांतिकारकांचे जीवन, कार्य आणि त्याग यांचे दस्तऐवजीकरण स्वतंत्र लघु पुस्तकांच्या मालिकेद्वारे व्हावे, जेणेकरून नव्या पिढीला भारतीय स्वातंर्त्यलढ्याचे समग्र आकलन होण्यास मदत होईल, अशी अपेक्षा राज्यपालांनी यावेळी व्यक्त केली. क्रांतिकारकांवरील पुस्तके मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषांमध्ये अनुवादित व्हावी असेही राज्यपालांनी सांगितले. भाषांतर हे भाषा आणि प्रदेश यांमधील दुवा म्हणून कार्य करते. त्यामुळे या राष्ट्रनायकांच्या प्रेरणादायी कथा देशभरातील जनतेपर्यंत पोहोचतील आणि सर्वांना प्रेरणा देतील, असे त्यांनी सांगितले. प्रकाशन सोहळ्याला भारतीय विचार साधना संस्थेचे अध्यक्ष डॉ गिरीश आफळे, जयेश क्षेमकल्याणी, अनुवादक चिन्मय खेडेकर, रवींद्र संघवी तसेच इतर निमंत्रित उपस्थित होते.

## मराठी साहित्य विश्वातील संवेदनशील शब्दसाधक हरपला – उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**मुंबई/प्रतिनिधी :** ज्येष्ठ साहित्यिक 'श्रीनिवास विनायक कुलकर्णी ऊर्फ 'श्रीवि' यांच्या निधनाने मराठी साहित्यविश्वाने एक संवेदनशील, अभ्यासू शब्दसाधक गमावला आहे. त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी भरून न निघणारी आहे, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्या शोकभावना व्यक्त करत त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.

शोकसंदेशात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणतात की, ग्रामीण मातीत रुजलेली संवेदनशीलता, निसर्गाविषयीची आत्मीयता आणि सामान्य माणसाच्या भावविश्वाचा वेध घेणारी विलक्षण लेखनशैली ही 'श्रीवि' यांच्या साहित्याची खरी ओळख होती. औदुंबरच्या भूमीशी असलेले त्यांचे जिव्हाळ्याचे नाते त्यांच्या लेखणीतून कायम जिवंत राहिले. त्यांच्या प्रत्येक साहित्यकृतीतून मराठी भाषेचे सौंदर्य आणि जीवनाकडे पाहण्याची एक वेगळी दृष्टी वाचकांना अनुभवायला मिळाली. 'मौज'सारख्या प्रतिष्ठित नियतकालिकाचे संपादक म्हणून त्यांनी मराठी साहित्याला नवे लेखक, नवे विचार आणि नवे साहित्यिक प्रवाह दिले.

## देशातील शिक्षण व्यवस्था सुधारणार; अभिजीत दिपके यांचा पुन्हा एकदा एल्गार



**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी :** कॉक्रोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी पत्रकार परिषद घेत केंद्र सरकारवर विविध विषयांवरुन जोरदार टीका केली. शिक्षण व्यवस्था, बेरोजगारी, न्यायलयीन व्यवस्था यावरुन सरकारवर निशाणा साधला. लोकांच्या समस्या जाणून घेणार – आम्हाला देशातील शिक्षण व्यवस्था सुधारायची आहे. 'क्या बोलती पब्लिक' कॅम्पेन सुरू करणार आहोत. आम्ही देशभरातील लोकांच्या समस्या जाणून घेणार आहोत, अशी माहिती अभिजीत दिपके यांनी दिली.

न्यायालयाकडं वेळ नसतो – ''राजकीय व्यवस्थेवरचा विश्वास उडत आहे. सत्ताधारी पक्षाच्या बाजूनं न्यायव्यवस्थेचे निकाल येतात. उद्योगपतींच्या प्रकरणावर लवकर सुनावणी होते. कोर्टात जाऊन पक्ष चोरला जात आहे. सामान्यांच्या प्रकरणावर न्यायालयाकडं वेळ नसतो. लोकांचा मीडियावर राग आहे. मीडियानं त्यांना प्रश्न विचारणं बंद केलं आहे, असा आरोप अभिजीत दिपके यांनी केला.

बेरोजगारीकडं तुम्ही आता दुर्लक्ष करू शकत नाही – ६० टक्के लोक ३५ वर्षाहून कमी वयाचे आहेत. जंतरमंतरवर बरोजगार देखील आले होते. नाईलाजानं अनेकांना डिलिव्हरी बॉय म्हणून काम करावे लागते. कमी पैशात घर चालवावे लागते. ८० टक्के बेरोजगारांकडे डिग्री आहे. त्यांना शिकून पश्चाताप वाटत आहे. ज्यांच्याकडं डिग्री नाही, ते सरकार चालवतात. आमचं भविष्य हे अशिक्षित लोक ठरवत आहेत. बेरोजगारीकडं तुम्ही आता दुर्लक्ष करू शकत नाही. दुर्लक्ष केले तर उाह'' दाखवून देईल. सगळ्या नागरी संस्थांना एकत्र करून नागरिक म्हणून एकत्र येत देशात सुधार आणण्याची गरज आहे. हा आमचा अजेंडा आहे, असं सांगत अभिजीत दिपके यांनी केंद्रावर हल्लाबोल केला.

''२५ जुलैला देशातील नागरिकांचा मोठा आणि ऐतिहासिक विजय मिळवलाय. धर्मेंद्र प्रधान यांचा केवळ राजीनामा घेतला नाही तर त्यांना झुकायला भाग पाडले,'' असं म्हणत जंतरमंतरवरील आंदोलनाची अभिजीत दिपके यांनी आठवण काढली.

# योग्य मार्गदर्शन आणि अभ्यासात सातत्य हीच यशाची गुरुकिल्ली!

## 'एलन'चे शाखा प्रमुख सिंग यांचा विद्यार्थ्यांना सल्ला

**लातूर/प्रतिनिधी :**डॉक्टर किंवा इंजिनिअर होण्याचं स्वप्न असेल, तर योग्य मार्गदर्शन आणि अभ्यासात सातत्य हीच यशाची गुरुकिल्ली आहे. विद्यार्थ्यांनी आपले ध्येय समोर ठेवून वेळेचे नियोजन केल्यास हमखास यश मिळते, असा मौलिक सल्ला एलन करिअर अकॅडमीचे शाखा प्रमुख तथा अकॅडमिक हेड ए. के. सिंग यांनी दिला.

येथील राजमाता जिजामाता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयास 'एलन'च्या टीमने बुधवारी भेट देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे होते. यावेळी 'एलन'चे बिझनेस डेव्हलपमेंट मॅनेजर पवन तिवारी, संस्थाध्यक्ष के. ए. जायेभाये, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, उपप्राचार्य कविता केंद्रे, अश्विनी केंद्रे, वैशाली केंद्रे, राजेंद्र जायेभाये, प्रा. बी. बी. खटके, एस. एम. गुरमे, आर. एन. पटने, ए. एस. खोत, एम. डी. मोटाडे, ए. बी. मुंडे, विष्णू कराड, परमेश्वर गित्ते, शिवकांत वाडीकर आदी उपस्थित होते.



यावेळी सिंग म्हणाले, सध्याच्या स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांनी इयत्ता ७वी किंवा ८वी पासून अभ्यासाची तयारी करावी. राष्ट्रीय पातळीवरील नीट व जेईई परीक्षेससह स्पर्धा परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन मिळणे गरजेचे आहे. यासाठी एलन करिअर अकॅडमीच्यावतीने विद्यार्थ्यांमधील क्षमता ओळखून त्यांना परिपूर्ण शिक्षण देण्यासाठी 'टॅलेन्ट टेक्स'ची सुरुवात करण्यात आली आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या नीट परीक्षेच्या निकालात चार टॉपर विद्यार्थ्यांमागे 'एलन'चा एक विद्यार्थी आहे. राजमाता जिजामाता विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनीही 'टॅलेन्ट टेक्स'चा लाभ घेऊन आपले स्वप्न साकार करावे, असे ते म्हणाले.

विद्यार्थ्यांनी अभ्यासात सातत्य ठेवणे गरजेचे आहे. परीक्षा ही एक संधी आहे. परीक्षेला धैर्याने सामोरे जा. 'टॅलेन्ट टेक्स'चा पर्याय निवडून यश संपादन करा, असे यावेळी तिवारी म्हणाले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य केंद्रे यांनी संकुलाच्या प्रगतीचा वाढता आलेख मांडला. या संकुलाची विद्यार्थिनी संस्कृती पवार हिने नीट परीक्षेत ६९० व भूषण घरटे याने ६९२ गुण मिळविले आहेत. याबरोबरच अनेक विद्यार्थी डॉक्टर व इंजिनिअर बनले आहेत. यश मिळविण्यासाठी कोणत्या बाबींवर लक्ष केंद्रीत करावे, याबाबत 'एलन'च्यावतीने मार्गदर्शन करण्यात येते. याचा लाभ घेऊन विद्यार्थ्यांनी अभ्यासात सातत्य ठेवत नामवंत कॉलेजमधून डॉक्टर व इंजिनिअर बनण्याचे ध्येय साध्य करावे, असे ते म्हणाले. सूत्रसंचालन प्रा. वैशाली पाटील यांनी केले तर आभार राजीव मुंढे यांनी मानले. कार्यक्रमास शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त 'हर घर तिरंगा' अभियानातून राष्ट्रप्रेमाचा जागर

**मुंबई/प्रतिनिधी :** सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांच्या वतीने ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त 'हर घर तिरंगा' अभियानांतर्गत विशेष प्रभात फेरीचे आयोजन रविवार, ९ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ९.०० ते ९.३० या वेळेत भारतीय विद्या भवन ते ऑगस्ट क्रांती मैदान, मुंबई या मार्गावर करण्यात आले आहे. या प्रभात फेरीत नागरिक, युवक, विद्यार्थी, विविध सामाजिक संस्था आणि सांस्कृतिकप्रेमींनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

९ ऑगस्ट १९४२ रोजी महात्मा गांधी यांनी दिलेल्या 'चले जाव' आंदोलनाच्या हाकेमुळे भारतीय स्वातंर्त्यलढ्याला निर्णायक दिशा मिळाली. ऑगस्ट क्रांती दिन हा भारतीय स्वातंर्त्यलढ्यातील त्याग, संघर्ष, शौर्य आणि राष्ट्रनिष्ठेची प्रेरणा देणारा ऐतिहासिक दिवस आहे. या दिवसाचे स्मरण करत स्वातंर्त्यसैनिकांच्या बलिदानाला अभिवादन करणे; तसेच प्रत्येक नागरिकामध्ये राष्ट्रप्रेम आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना दृढ करणे, हा या प्रभात फेरीमागील प्रमुख उद्देश आहे.

'हर घर तिरंगा' अभियानाच्या माध्यमातून प्रत्येक नागरिकाने आपल्या घरावर अभिमानाने राष्ट्रध्वज फडकवावा, तिरंग्याविषयी आदर आणि राष्ट्रीय अस्मितेची भावना अधिक बळकट व्हावी तसेच देशाच्या स्वातंर्त्यासाठी बलिदान देणाऱ्या वीरांचे स्मरण भावी पिढीपर्यंत पोहोचावे, या उद्देशाने या प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले आहे. देशभक्तीपर जनजागृती उपक्रमांच्या माध्यमातून स्वातंर्त्यलढ्याचा इतिहास, ऑगस्ट क्रांतीचे महत्त्व, तिरंग्याचा सन्मान आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना जनमानसात अधिक दृढ करणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे.

# लोकशाही मराठवाडा सन्मान २०२६ पुरस्कारासाठी सामाजिक कार्यकर्ते संजय नागनाथ राजुळे यांची निवड

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर येथील सामाजिक कार्यकर्ते संजय नागनाथ राजुळे यांच्या गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या समाजहिताच्या विविध उपक्रमांची दखल घेत लोकशाही मराठी न्यूज चॅनेल, मुंबई यांच्या वतीने देण्यात येणाऱ्या ''लोकशाही मराठवाडा सन्मान २०२६'' या प्रतिष्ठेच्या पुरस्कारासाठी त्यांची निवड करण्यात आली आहे.



संजय राजुळे हे गेल्या २२ वर्षांपासून समाजसेवेच्या क्षेत्रात सातत्याने कार्यरत असून त्यांनी अनेक लोकोपयोगी उपक्रम राबविले आहेत. त्यांच्या कार्यामध्ये विशेषतः ''आपले आरोग्य, आपलीच जबाबदारी'' या जनजागृती अभियानातून दररोज व्यायाम, योगा, आरोग्य जागृती, व्यसनमुक्ती, तंबाखूमुक्त समाज, रक्तदान, नेत्रतपासणी, आरोग्य शिबिरे, कॅन्सर जनजागृती, नागरिकांना निरोगी जीवनाचा संदेश देण्याचे कार्य सातत्याने सुरू आहे.

याशिवाय प्लास्टिकमुक्त भारत अभियान अंतर्गत हजारो नागरिकांना मोफत कापडी पिशव्यांचे वाटप, प्लास्टिकविरोधी जनजागृती, पर्यावरण संरक्षणासाठी मोफत वृक्षलागवड, पाणी संवर्धन, जैविक शेतीचा प्रचार, स्वच्छता अभियान, गरजूंना मदत, विविध सामाजिक संस्थांच्या माध्यमातून लोकसेवा असे अनेक उपक्रम त्यांनी यशस्वीपणे राबविले आहेत.

तसेच सप्तफेरे मॅट्रिमोनीच्या माध्यमातून अनेक युवक-युवतींचे विवाह जुळवून सामाजिक बांधिलकी जपण्याचे कार्यही त्यांनी केले आहे. समाजातील विविध घटकांना एकत्र आणून आरोग्य, पर्यावरण आणि सामाजिक परिवर्तनासाठी त्यांनी केलेले कार्य उल्लेखनीय मानले जाते.

या उल्लेखनीय सामाजिक योगदानाची दखल घेत लोकशाही मराठवाडा सन्मान २०२६ हा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात येणार आहे.

पुरस्कार वितरण सोहळा
दिनांक : ८ ऑगस्ट २०२६
वेळ : सकाळी ९.३० वाजल्यापासून
स्थळ : मंगलम रिसॉर्ट छत्रपती संभाजीनगर

या पुरस्काराबद्दल लातूर जिल्ह्यासह विविध सामाजिक, शैक्षणिक, वैद्यकीय आणि पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवरांनी संजय नागनाथ राजुळे यांचे अभिनंदन करत त्यांच्या पुढील सामाजिक कार्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत.

## संपादकीय...

### सरकारला कर्ज घेण्याची गरज का पडते?

केंद्र सरकारचे एकूण कर्ज प्रथमच २०० लाख कोटी रुपयांचा टप्पा ओलांडून २०२५-२६ या आर्थिक वर्षात २०१.१७ लाख कोटी रुपयांवर पोहोचले आहे. सरकारच्या मते, 'जीडीपी'च्या तुलनेत कर्जाचे प्रमाण कमी होत आहे, करसंकलन सातत्याने वाढत आहे आणि कर्जाचा मोठा हिस्सा पायाभूत सुविधांमध्ये गुंतवला जात असल्याने वित्तीय स्थिती सक्षम आहे. राज्यसभेत केंद्रीय वित्त राज्यमंत्री पंकज चौधरी यांनी दिलेल्या माहितीनुसार, २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या अखेरीस केंद्र सरकारच्या एकूण बकाया देयकांचा आकडा २०१.१७ लाख कोटी रुपयांवर पोहोचला आहे. २०२४-२५ मध्ये हे कर्ज सुमारे १८५ लाख कोटी रुपये होते. म्हणजेच एका वर्षात सुमारे आठ टक्क्यांनी वाढ झाली आहे. मात्र, सरकारचा दावा आहे की, ही वाढ चिंतेचे कारण नाही. कारण, देशाची अर्थव्यवस्था अधिक वेगाने विस्तारत असून, जीडीपीच्या तुलनेत कर्जाचे प्रमाण सातत्याने कमी होत आहे. त्यामुळे कर्जफेडीची क्षमता अधिक मजबूत झाली आहे. एकूण कर्जापैकी १८३.४३ लाख कोटी रुपये हे सार्वजनिक कर्ज आहे. त्यातील १७३.५५ लाख कोटी रुपये हे देशांतर्गत स्रोतांमधून उभारण्यात आले आहेत. सरकारी रोखे, ट्रेझरी बिले, लघुबचत योजना आणि इतर वित्तीय साधनांच्या माध्यमातून सरकारने हे कर्ज उभे केले आहे. तर, उर्वरित ९.८९ लाख कोटी रुपये हे परदेशी कर्ज आहे. हे विविध बहुपक्षीय संस्था, आंतरराष्ट्रीय वित्तीय संघटना आणि विदेशी कर्जदात्यांकडून घेण्यात आले आहे. अर्थतज्ज्ञांच्या मते, भारताच्या सार्वजनिक कर्जामध्ये देशांतर्गत कर्जाचा मोठा वाटा असणे ही सकारात्मक बाब आहे. त्यामुळे विनिमय दरातील चढ-उतार किंवा जागतिक वित्तीय अस्थिरतेचा परिणाम तुलनेने कमी होतो. सरकारचा महसूल आणि खर्च यामध्ये जेव्हा तफावत निर्माण होते, तेव्हा ती भरून काढण्यासाठी सरकारला कर्ज घ्यावे लागते. महसुलापेक्षा खर्च जास्त असल्यास निर्माण होणाऱ्या तुटीला राजकोषीय तूट म्हटले जाते. विकसनशील अर्थव्यवस्थांमध्ये कर्ज घेणे ही असामान्य बाब नसते. उलट रस्ते, रेल्वे, बंदरे, विमानतळ, ऊर्जा, डिजिटल पायाभूत सुविधा आणि इतर दीर्घकालीन मालमत्ता उभारण्यासाठी कर्जाचा वापर केल्यास भविष्यात आर्थिक वाढीचा पाया अधिक मजबूत होतो. त्यामुळे कर्ज किती आहे यापेक्षा ते कोणत्या उद्देशासाठी वापरले जात आहे, हे अधिक महत्त्वाचे ठरते. अर्थव्यवस्थेची खरी क्षमता मोजताना केवळ कर्जाचा आकडा पाहिला जात नाही. त्या तुलनेत देशाचे सकल देशांतर्गत उत्पादन किती वेगाने वाढत आहे, हा महत्त्वाचा निकष असतो. जर जीडीपीची वाढ कर्जाच्या वाढीपेक्षा जास्त असेल, तर कर्जाचा वास्तविक भार कमी होत जातो. त्यामुळे सरकारची कर्जफेडीची क्षमता वाढते आणि वित्तीय स्थैर्य अधिक मजबूत होते. कोरोना महामारीदरम्यान अर्थव्यवस्थेला आधार देण्यासाठी सरकारला मोठ्या प्रमाणावर कर्ज घ्यावे लागले होते. त्या काळात कर्ज-ते-जीडीपी गुणोत्तर वाढले होते. मात्र, महामारीनंतर अर्थव्यवस्थेने वेगाने सावरत करसंकलनात विक्रमी वाढ नोंदवली. परिणामी, हे गुणोत्तर आता पुन्हा घटू लागले आहे. कर्जाचा मोठा परिणाम व्याजाच्या स्वरूपात दिसून येतो. २०२१-२२ मध्ये सरकारने व्याजापोटी ८.०५ लाख कोटी रुपये खर्च केले होते. २०२५-२६ मध्ये हा खर्च वाढून तब्बल १२.४३ लाख कोटी रुपयांवर पोहोचला आहे. म्हणजे अवघ्या चार वर्षांत व्याजावरील खर्चात सुमारे ४.४ लाख कोटी रुपयांची वाढ झाली आहे. महसुली खर्चातील मोठा हिस्सा केवळ जुन्या कर्जावरील व्याज फेडण्यासाठी वापरला जात असल्याने सरकारसमोर विकासकामे आणि वित्तीय शिस्त यामध्ये समतोल राखण्याचे आव्हान अधिक कठीण होत आहे. गेल्या काही वर्षांत केंद्र सरकारने राजकोषीय तूट कमी करण्यावर विशेष भर दिला आहे. २०२२-२३ मध्ये राजकोषीय तूट १७.३८ लाख कोटी रुपये होती. ती २०२५-२६ मध्ये १५.१९ लाख कोटी रुपयांपर्यंत आणण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. राजकोषीय तूट कमी झाल्याने सरकारची कर्ज घेण्याची गरज कमी होते आणि दीर्घकालीन वित्तीय स्थैर्याला बळ मिळते. सरकारने खर्चाच्या प्राधान्यक्रमात भांडवली गुंतवणुकीला अग्रक्रम दिला आहे. २०२०-२१ मध्ये एकूण सरकारी खर्चातील भांडवली खर्चाचा वाटा १८.७ टक्के होता. तो २०२५-२६ मध्ये वाढून २७.२ टक्क्यांवर पोहोचला आहे. रस्ते, रेल्वे, मेट्रो, बंदरे, विमानतळ, डिजिटल नेटवर्क आणि इतर पायाभूत सुविधांवरील गुंतवणूक दीर्घकालीन आर्थिक वाढ, रोजगारनिर्मिती आणि खासगी गुंतवणुकीला चालना देणारी ठरत आहे. २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात सरकारने १७.१५ लाख कोटी रुपयांच्या भांडवली खर्चाचे उद्दिष्ट ठेवले आहे. हा आकडा राजकोषीय तुटीच्या अंदाजित १६.९६ लाख कोटी रुपयांपेक्षाही अधिक आहे. यातून सरकारचा भर महसुली खर्चापेक्षा दीर्घकालीन उत्पादक मालमत्ता निर्माण करण्यावर असल्याचे स्पष्ट होते. पायाभूत सुविधा मजबूत झाल्यास उद्योग, उत्पादन, रोजगार आणि करसंकलन यांना चालना मिळते, असा सरकारचा विश्र्वास आहे. कोणत्याही देशासाठी कर्ज घेणे ही असामान्य गोष्ट नाही. अमेरिका, जपान, ब्रिटनसह बहुतांश मोठ्या अर्थव्यवस्था विकासासाठी मोठ्या प्रमाणावर कर्ज घेतात. मात्र, कर्जाचा वेग, त्यावरील व्याजाचा भार आणि त्याचा वापर या तीन बाबी निर्णायक ठरतात. सरकारचा दावा आहे की, भारताची अर्थव्यवस्था वेगाने वाढत आहे, करसंकलन मजबूत आहे आणि कर्जाचा मोठा हिस्सा उत्पादक गुंतवणुकीसाठी वापरला जात आहे. त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत कर्जाची पातळी नियंत्रणाबाहेर गेलेली नाही. तथापि, काही अर्थतज्ज्ञांचे मत वेगळे आहे. त्यांच्यानुसार, भविष्यात व्याजाचा खर्च याच वेगाने वाढत राहिला, तर सामाजिक कल्याणकारी योजना, आरोग्य, शिक्षण आणि इतर विकासात्मक खर्चावर दबाव निर्माण होऊ शकतो. त्यामुळे कर्जवाढीबरोबरच महसूल वाढ आणि वित्तीय शिस्त कायम ठेवणे तितकेच आवश्यक ठरेल. अर्थशास्त्रात एक मूलभूत तत्त्व मानले जाते की, कर्जाची रक्कम किती आहे यापेक्षा त्या कर्जाचा उपयोग कोणत्या प्रकारच्या खर्चासाठी केला जात आहे, हे अधिक महत्त्वाचे असते. जर कर्जाचा मोठा भाग पायाभूत सुविधा, औद्योगिक विकास, ऊर्जा, डिजिटल अर्थव्यवस्था, संरक्षण क्षमता किंवा उत्पादक मालमत्तांच्या निर्मितीसाठी वापरला गेला, तर त्यातून भविष्यात उत्पन्न, रोजगार आणि करसंकलन वाढण्याची शक्यता निर्माण होते. उलट, महसुली खर्च भागवण्यासाठी किंवा केवळ जुन्या कर्जाची परतफेड करण्यासाठी सातत्याने नवीन कर्ज घ्यावे लागत असेल, तर ती परिस्थिती दीर्घकालीन दृष्टीने वित्तीय आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकते. त्यामुळे कर्जाची गुणवत्ता आणि त्यातून निर्माण होणारा आर्थिक परतावा हेच कोणत्याही सरकारच्या वित्तीय व्यवस्थापनाचे खरे मोजमाप ठरते. सध्या जागतिक अर्थव्यवस्था उच्च व्याज दर, भू-राजकीय संघर्ष, पुरवठा साखळीतील अडथळे आणि जागतिक व्यापारातील मंदी अशा अनेक आव्हानांना सामोरी जात आहे. अशा परिस्थितीत भारतासारख्या वेगाने विकसित होत असलेल्या अर्थव्यवस्थेला विकासाचा वेग कायम ठेवतानाच वित्तीय शिस्तही पाळावी लागणार आहे. जर आर्थिक वाढ अपेक्षेप्रमाणे झाली, करसंकलन मजबूत राहिले आणि खासगी गुंतवणूक वाढत राहिली, तर वाढत्या कर्जाचा भार सहज पेलता येईल. मात्र, आर्थिक वाढीचा वेग मंदावला किंवा जागतिक संकटांमुळे महसूल कमी झाला, तर वाढत्या व्याजाच्या खर्चामुळे सरकारी अर्थसंकल्पावर अतिरिक्त दबाव निर्माण होऊ शकतो. त्यामुळे आगामी काही वर्षे भारताच्या सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापनासाठी अत्यंत निर्णायक ठरणार आहेत.

# शिंदेसाहेब, तुमचा गद्दारीचा डाग आम्ही पुसणार होतो, पण धोका दिलात

## मनोज जरांगेंची एकनाथ शिंदेंवर पहिली टीका, बावनकुळेंवरही हल्ला

**निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी**

**जालना** : मराठवाड्यात कुणबी जातीचे प्रमाणपत्र मिळवलेल्या चार मराठा महिला लोकप्रतिनिधींची जात वैधता जात पडताळणी समितीने रद्द केल्यानंतर राज्यातील राजकारण पुन्हा तापले आहे. बीड , परभणी आणि छत्रपती संभाजीनगर येथील लोकप्रतिनिधींची प्रमाणपत्रे अवैध ठरवल्यानंतर मराठा आरक्षण आणि कुणबी नोंदींचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. या पार्श्वभूमीवर मनोज जरांगे पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि भाजप मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावर गंभीर आरोप करत सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. जरांगे म्हणाले की, राज्यात सरकारकडून नवीन कट रचण्यात आला आहे. प्रमाणपत्र त्यांनीच द्यायचे आणि त्यांनीच रद्द करायचे. हा कट देवेंद्र फडणवीस साहेब आणि एकनाथ शिंदे यांच्या मंत्र्यांकडून रचला जात आहे. एकनाथ शिंदे यांचे नाव मी तीन वर्षांत प्रथमच घेत आहे. सरकार मराठ्यांचे कसे वाटोळे करत आहे, हे मी सिद्ध करून दाखवणार आहे,'' असा आरोप त्यांनी केला.

त्यांनी पुढे दावा केला की, सरकारने जाणूनबुजून मराठा समाजाचे नुकसान करण्यासाठी नियोजनबद्ध भूमिका घेतली आहे. ''मी अनेक लोकप्रतिनिधींशी चर्चा केली. सरकारने कट रचून मराठ्यांचे पानिपत करण्याचा प्रयत्न केला आहे. २०२९ मध्ये तुम्ही आमच्या हातात असाल. एवढा मोठा बदला घेऊ की, तुम्ही आयुष्यात पाहिला नसेल. कांड्यावर मोजण्याइतकेही युती सरकारचे लोक निवडून येणार नाहीत,'' असा इशाराही त्यांनी दिला.

दरम्यान, ज्योती दहीहंडे प्रकरणाचा उल्लेख करत त्यांनी सरकारवर पुन्हा निशाणा साधला. ''फडणवीस, तुम्ही उगाच मराठ्यांना अंगावर घेतलं. ज्योती दहीहंडे प्रकरणात यशवंत दहीहंडे यांची नोंद उर्दूमध्ये सापडली आहे. ती नोंद शिंदे समितीने ग्रामपंचायतीच्या भिंतीवर लावली होती. मराठ्यांच्या मंत्र्यांच्या माध्यमातून मुंडके तोडायचे बंद करा. मी बोकांडी बसलो तर उठणारच नाही,'' असा इशारा त्यांनी दिला. यावेळी त्यांनी चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावरही थेट आरोप केला. ''बावनकुळेंनी कुणबी प्रमाणपत्रे रद्द करण्यास सांगितले. त्यांनी मराठ्यांचे वाटोळे करण्याचे ठरवले आहे. बावनकुळेंची नार्को टेस्ट करा. एवढे अधिकार दिले तर मी तुमचे पंधरा-वीस आमदार पाडीन. पैशासाठी तुम्ही प्रमाणपत्रे रद्द केली का?'' असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

तीन वर्षांत पहिल्यांदाच एकनाथ शिंदे यांच्यावर मनोज जरांगे यांनी टीका केली. मनोज जरांगे म्हणाले की, तुमचा गद्दारीचा डाग आम्ही पुसणार होतो. सत्तेत गेलात म्हणून आमच्यावर माज उतरवणार का? शिंदे साहेब, तुम्ही डबल गेम खेळत आहात का? एकीकडून ओबीसी सांभाळत आहात का? परळीच्या टोळीवाल्याच्या नादी लागून तुमच्या ऑफिसला कसे येतात? मराठ्यांचा विरोध करणारे ओबीसी नेते तुमच्या बाळासाहेब भवनमध्ये येतात कसे? मराठ्यांचे काही समन्वयक तुम्ही माझ्या अंगावर घालत आहात. एकीकडे मी पण लागतो. तुमचाच एक नेता ज्याचे संभाजीनगरला कॉलेज आहे. तिथे माझ्या विरोधात बैठका होतात.



मैत्री करावी तर ठासून करावी. तुमचा गद्दारीचा डाग पुसायला आम्ही मराठे आहोत. आमच्यावर उद्धव ठाकरे बरे म्हणण्याची वेळ येऊ देऊ नका.

संजय शिरसाट यांच्या बंगल्यात बैठका झाल्या आहेत. तुमचे न येणारे सीट आम्ही कानाकोपऱ्यात निवडून आणले आणि तुम्ही आमचा गेम करणार का? यांचा माज जिरवावा लागेल. लाड भाऊमुळे तुमच्याशी मिळते-जुळते करत होतो. मी बापाला मानत नाही, तर तुम्ही कोण? इथून पुढे मराठ्यांनी राजकारणात पडू नये. व्हॅलिडिटी मिळाल्याशिवाय निवडणुकीला उभे राहू नका. मराठ्यांचे नेते म्हणवणारे राणे, विखे, चव्हाण, शेलार आता का बोलत नाहीत? आता पवार साहेब म्हातारे झाले आहेत. अजितदादा आणि शिंदे साहेबांना मराठ्यांनी तुटून मतदान केले. उद्धव ठाकरे बरे म्हणावे लागतील. तुमचा गद्दारीचा डाग आम्ही पुसला.

शिंदे साहेब, निवडणुकीला तुमच्याकडून पैसे घेतले असतील तर दाखवून द्या. भुमरे मामा, सहा नंबरला तुम्ही होतात निवडणुकीत. माझ्या मराठ्याच्या लेकरांनी तुमच्यासाठी जीवाचं रान केलं. इतक्या लवकर तुम्ही विसरलात का? तुम्हाला 'मामा' शिवाय मी कधी बोललो नाही. तुमच्या जिल्हा परिषदेला काडी लागू द्या. शिंदे साहेबांची मी इतकी सीट पाडणार की, त्यांना आयुष्यात पश्चात्ताप होईल. एकनाथ शिंदे साहेब, जीवाभावातून आम्ही तुमचं काम करत होतो, अशी टीका त्यांनी एकनाथ शिंदे यांच्यावर केली.

मनोज जरांगे पाटील पुढे म्हणाले की, शिरसाट साहेब, तुम्ही निवडून यावे म्हणून आम्ही खूप खस्ता खाल्ल्या. परळीच्या नेत्यासारखाच तुमचा कारभार पीएच्या हातात गेलाय. एकनाथ शिंदे साहेबांनी सांगितलं म्हणून तुम्ही कॉलेजमध्ये माझ्या विरोधात बैठका घेणार आणि त्याला बळ एकनाथ शिंदे देणार. फडणवीस साहेब यांची मी झाक उतरवलेली आहे, लोकसभेला मी दाखवलेलं आहे. फडणवीस साहेब मराठ्यांच्या जीवावर सत्तेत बसले आहेत. तेव्हा तुम्ही मेटाकुटीला आला होतात, राजकारणातून संपेल म्हणून. सगळं बाहेर काढायला लावू नका, फडणवीस साहेब. अतुल सावे आभाळ आल्यावर कुत्रे जसे करतात तसे करतो.

लाड भाऊंना सांगितलं होतं, तुमचे हे अतुल सावे वगैरे असे प्रकार करत आहेत. त्याच्या अगोदर शिरसाट साहेबांनी केलं होतं. तुमच्या बंगल्यात बैठक झाली, चूक करू नका म्हणून. त्यावेळेस शिरसाट म्हणाले होते, ''चुकलो.'' फडणवीस यांनी सांगितल्याशिवाय बावनकुळे काही करू शकत नाही. मला डॅमेज करण्याचा प्रयत्न होत आहे. मी सरकारला परवडत नाही, मला एकटं पाडायचं आहे. मी ना भाजपचा होतो, ना काँग्रेसचा होतो, ना शिवसेनेचा होतो म्हणून, असे देखील मनोज जरांगे म्हणाले.

शिंदे साहेब, मी तुम्हाला उघडं पाडू शकतो. पंचवीस-तीस तुमचे आणि बावनकुळेमुळे फडणवीसांचे २५ आमदार घालवू शकतो. शिंदे साहेब, मराठ्यांचा घात करायचा नाही. बावनकुळे, शेलार आणि लाड यांच्याबाबत बोलताना ते म्हणाले, प्रसाद लाड काय करील? मरमर करत आहे. यांनी वाटोळं करायचं ठरवलं असेल तर ते काय करतील? विखे पाटील आणि प्रसाद लाड यांना मी तीन-चार वेळा सांगितलं आहे आणि आमच्या त्या उदय सामंत साहेबांनाही. मग फडणवीस यांचा डाव आहे, नाहीतर काय? त्यांना बावनकुळे ऐकत नाही का? फडणवीस साहेब, डोक्यातील हवा काढा. आशिष शेलार यांना मी फक्त सांगितलं, हे असं होतंय म्हणून. ५० टक्क्यांवरील दोन टक्के रद्द करून दाखवायचं होतं, नाही का? ते रद्द. आमचा हैदराबाद गॅजेटचा जीआर बोगस आहे, तर १९९६ चादेखील बोगसच आहे.

## आकांक्षा चमोलानं लॉक अप २च्या एलिमिनेशननंतर गौरव खन्नासोबत घटस्फोट घेणार असल्याची केली पुष्टी

हैदराबाद : टीव्ही अभिनेत्री आकांक्षा चमोलानं तिचा पती आणि प्रसिद्ध अभिनेता गौरव खन्नापासून घटस्फोट घेण्याची घोषणा केल्यामुळं ती अनेक दिवसांपासून चर्चेत आहे. अभिनेत्रीनं लॉक अप सीझन २ या रिॲलिटी शोदरम्यान हा खुलासा केला होता. या स्पर्धेत बराच काळ टिकून राहिल्यानंतर, ती अंतिम फेरीपूर्वीच स्पर्धेतून बाहेर पडली आहे. बाहेर पडल्यावर तिनं पती गौरव खन्नासोबतच्या घटस्फोटाबाबत आपली पहिली प्रतिक्रिया दिली. आकांक्षानं स्पष्ट केलं की, तिनं हे विधान टीआरपीसाठी केले नव्हते आणि ती खरोखरच घटस्फोटाची प्रक्रिया पूर्ण करत आहे. टीआरपीसाठी हे केले नाही जेव्हा तिला विचारण्यात आलं की लोक असा दावा करत आहेत की, तिनं केवळ शोचा टीआरपी वाढवण्यासाठी घटस्फोटाचा उल्लेख केला, तेव्हा



अभिनेत्रीनं म्हटलं, ''बघा, माझ्या पतीपासून घटस्फोट घेण्याबाबत मी इतक्या मोठ्या शोमध्ये खोटे का बोलेन? मी हे टीआरपी किंवा प्रसिद्धीसाठी केले नाही. माझ्या घरी या आणि माझ्या कायदेशीर टीमला भेटा. आता मी शोमधून बाहेर आले आहे, तेव्हा आम्ही यावर चर्चा करत आहोत.

कागदपत्रांवर स्वाक्षरी झाली आहे आणि प्रक्रिया जवळपास पूर्ण झाली आहे, हे टीआरपीसाठी नाही.''

घटस्फोटाच्या कागदपत्रांवर स्वाक्षरी : आकांक्षा पुढं म्हटलं की, ''जेव्हा आमचे लग्न होत होते, तेव्हा लोकांना वाटलं की आम्ही प्रसिद्धीसाठी ते करत आहोत.'' आम्ही कलाकार आहोत याचा अर्थ असा नाही की, आम्ही जे काही करतो ते प्रसिद्धीसाठीच असते.'' दरम्यान गौरव खन्ना सध्या खतरो के खिलाडी या टीव्ही रिॲलिटी शोमध्ये स्पर्धक म्हणून सहभागी झाला आहे. शोमध्ये जाण्यापूर्वी, त्यानं आपली पत्नी आकांक्षाला भेटण्यासाठी लॉक अप २शोमध्ये गेला होता.

या जोडप्याचं लग्न कधी झालं? : आकांक्षा आणि गौरव २०२६मध्ये विवाहबंधनात अडकले, मात्र, लग्नाला अनेक वर्षे उलटूनही त्यांना अपत्य नाही. दोघेही दीर्घकाळापासून टेलिव्हिजन क्षेत्रात कार्यरत आहेत आणि अनेक मालिकांमध्ये ते झळकले आहेत.

## विलास कारखान्याला सर्वोत्कृष्ट पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल जळकोट तालुका काँग्रेस व सेवा संस्थांकडून चेअरमन वैशालीताई देशमुख यांचा सत्कार

**लातूर/प्रतिनिधी** : वैशालीनगर, निवळी (लातूर) येथील विलास सहकारी साखर कारखान्यास डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशन-इंडिया, पुणे यांच्या वतीने ''सर्वोत्कृष्ट सहकारी साखर कारखाना - २०२६'' हा मानाचा विशेष पुरस्कार जाहीर झाला आहे. या यशाबद्दल जळकोट तालुका काँग्रेस कमिटी, विविध सेवा सहकारी संस्थांचे चेअरमन आणि विविध गावांच्या सरपंचांच्या वतीने विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन वैशाली विलासराव देशमुख यांची बाभळगाव येथील निवासस्थानी भेट घेऊन सत्कार करण्यात आला व सर्व संचालक मंडळाचे अभिनंदन करण्यात आले.

जळकोट तालुक्यातील लोकप्रतिनिधी व पदाधिकाऱ्यांची उपस्थिती


याप्रसंगी बाभळगाव येथे भेट घेऊन सत्कार करणाऱ्या शिष्टमंडळात जळकोट तालुका काँग्रेस कमिटीचे तालुकाध्यक्ष मारोती पांडे, ज्येष्ठ नेते बाबुरावजी जाधव, जिल्हा परिषद सदस्य रमन अदावळे, जळकोट पंचायत समितीचे सभापती संभाजी कोंसबे, ॲड.पांडे, उपसभापती माधव वाघमारे यांची प्रमुख उपस्थिती होती. तर तसेच धनराज दळवे, वैजनाथ चव्हाण, मंगेश हुडेकर, अल्पसंख्याक अध्यक्ष नूर पठाण, सहकार बोर्ड संचालक आनंद आगलावे, मच्छिंद्र केंद्रे, विनायक केंद्रे, व्यंकट केंद्रे, मुजमील मुंडेकर, मंगरुळचे चेअरमन धनराज पाटील, लाळी (खुर्द) चे चेअरमन पांडुरंग वाकळे, विराळचे चेअरमन बळीराम सोनटक्के, वाजरवाडीचे चेअरमन राम परीट, जगळपूरचे चेअरमन मोहन लोहकरे, चेराचे चेअरमन दिलीपराव माने, वडगावचे चेअरमन मारोती बडे, धामणीचे चेअरमन ज्ञानोबा मालुसुरे, गुत्तीचे चेअरमन माधव धुळे, पाणीदार प्रकल्पाध्यक्ष अशोकराव गुणुचे, सुल्लाळीचे चेअरमन प्रशांत बिरादार, मुखीम पठाण (मंगरुळ), राठोड यांच्यासह जळकोट तालुक्यातील काँग्रेस पदाधिकारी, विविध सेवा संस्थांचे चेअरमन, सरपंच व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.


# रंगरंगुल्या, सानसानुल्या गवतफुला रे गवतफुला..! रत्नागिरीतील सड्यांवर रानफुलांचा रंगोत्सव..


हिरवी नाजुक रेशिम पाती, दोन बाजूनी सळसळती

नीळ नीळुली एक पाकळी, पराग पिवळे झगमगती

कवयित्री इंदिरा संत यांच्या कवितेच्या या ओळी वाचताना डोळ्यांसमोर जो निसर्गाचा विलोभनीय कॅनव्हास उभा राहतो, तोच कॅनव्हास सध्या रत्नागिरी जिल्ह्यातील अनेक गावांमधील सड्यांवर प्रत्यक्षात अवतरला आहे. पावसाच्या अधून-मधून बरसाणार्‍या सरी ओसरल्यावर, इथल्या तांबड्या मातीच्या सड्यांनी जणू हिरवा शालू नेसला आहे. त्यावर विलोभनीय रानफुलांची रंगीबेरंगी 'वेलबुट्टी' साकारली आहे.







साताऱ्याचे 'कास पठार' आणि कोल्हापूरचे 'मसाई पठार' यांनी आजवर आपल्या रानफुलांच्या सौंदर्याने पर्यटकांना भुरळ घातली आहे. पण, आता रत्नागिरी परिसरातील सडेही ''आम्ही देखील पाठीमागे नाही, येवा आमचो सौंदर्य न्याहाळा!'' अशी प्रेमळ साद पर्यटकांना घालत आहेत. साडवली, जैतापूर, देवाचे गोठणे, नाटे अशा २० ते २२ हून अधिक सड्यांवर सध्या निसर्गाने विविध रंगांच्या रानफुलांची अक्षरशः उधळण केली आहे.

या सड्यांवर सध्या दीपकाडी, कंदीलपुष्प, कुमुदिनी, रानहळद, विविध प्रकारच्या अमरी, चोहळा, परजीवी वाढणारे आकर्षक तुरे, केना अशा कितीतरी रानफुलांनी बहर आणला आहे.

'सह्याद्री संकल्प सोसायटी'चे कार्यकारी संचालक प्रतीक मोरे या सौंदर्याविषयी सांगताना म्हणतात, ''साडवलीच्या सड्यावर एकदांडी ( ) ही कंदवर्गीय वनस्पती सध्या फुलली आहे.या प्रजातीचा 'देवरुखेन्स' हा एक नवा वाणही समोर आला आहे. पावसाळ्यातील एक-दोन महिने आपले मनमोहक रूप दाखवून या वनस्पती पुन्हा जमिनीत सुप्तावस्थेत जातात.''

चोहळा ओहोळांच्या कडेला वाढणारी 'चोहळा ही आलेवर्गीय वनस्पती सध्या निसर्गाच्या कुशीत फुलली आहे. औषधी गुणधर्म असलेली ही वनस्पती आता दुर्मिळ आणि धोकाग्रस्त प्रजातींमध्ये मोडते.

गुलाबी कापरी कमळ जैतापूर, नाटे आणि धाऊलवल्ली अशा १० ते १२ गावांच्या परिसरातील सड्यांवर 'कापरी कमळ' पाहायला मिळते. डॉ. अरुण चांदोरे आणि डॉ. श्रीरंग यादव यांनी शोधून काढलेली ही वनस्पती अतिशय सुंदर आहे. तिला पाणतिळवण असेही म्हणतात. तिची नाजूक गुलाबी फुले वार्‍यावर डोलताना पाहून त्या आकर्षक सौंदर्यात हरवायला होतं. ती डोलताना कापत असल्याचा भास होतो. एकाचवेळी ताटवे फूलल्याने संपूर्ण सडे गुलाबी रंगात न्हाऊन निघाले आहेत.

गुलाबी भुईचक्र वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. प्रताप नाइकवडे सांगतात, साडवली आणि आंबोलीच्या सड्यांवर ( ) म्हणजेच 'गुलाबी भुईचक्र' ही वनस्पती आढळते. दीपकाडीच्या आधी फूलणारी ही अतिशय सुंदर फुले, सड्यावर जणू एक गुलाबी चादरच अंथरतात. तिला तिची एक वेगळी आणि स्वतंत्र ओळख आता प्राप्त झाली आहे.हे सौंदर्य केवळ पाहण्यासाठी नाही, तर जपण्यासाठीही आहे. याच उद्देशाने सह्याद्री संकल्प सोसायटीतर्फे गेली अनेक वर्षे 'फुलोत्सव' साजरा केला जात आहे. यातून विद्यार्थ्यांना या नैसर्गिक अधिवासाची आणि फुलांची शास्त्रीय माहिती दिली जाते. या सड्यांची आणि दुर्मिळ रानफुलांची जपणूक करणे ही आता आपल्या सर्वांचीच सामूहिक जबाबदारी बनली आहे.

निसर्गाचे हे अद्भुत आणि निखळ सौंदर्य डोळे भरून पाहताना, मनातील कोलाहल शांत होतो आणि मलाही वाटे लहान होऊन, तुझ्याहून ही लहान रे

तुझ्या संगे सडा रहावे, विसरुन शाळा, घर सारे

ओठांवर सहजच या ओळी रेंगाळू लागतात..

**प्रशांत कुसुम आनंदराव सातपुते**
**जिल्हा माहिती कार्यालय, रत्नागिरी**

## विविध वृत्त...

### बीडीडीतील रहिवाशांना दिलासा; ऑगस्टपासून दरमहा ३० हजार रुपये घरभाडे

**मुंबई /प्रतिनिधी:** वरळी, ना. म. जोशी मार्ग आणि नायगाव येथील बीडीडी चाळीतील रहिवाशांना अखेर राज्य सरकारने मोठा दिलासा दिला आहे. बीडीडीतील रहिवाशांच्या तात्पुरत्या स्थलांतरासाठी म्हाडाच्या मुंबई मंडळाकडून दरमहा २५ हजार रुपये घरभाडे दिले जात होते. मात्र, आता त्यात वाढ करण्यात आली असून रहिवाशांना दरमहा २५ हजार रुपयांऐवजी ३० हजार रुपये घरभाडे दिले जाणार आहे. ऑगस्टपासून नवीन घरभाडे लागू होणार असून, यासंबंधीचा शासन निर्णय गृहनिर्माण विभागाने प्रसिद्ध केला आहे.

म्हाडाच्या मुंबई मंडळाच्या माध्यमातून वरळी, ना. म. जोशी मार्ग आणि नायगाव येथील बीडीडी चाळींचा पुनर्विकास मार्गी लावला जात आहे. या पुनर्विकासाअंतर्गत १५ हजारांहून अधिक बीडीडीवासियांचे पुनर्वसन करून त्यांना ५०० चौ. फुटाची घरे दिली जाणार आहेत. त्यानुसार पहिल्या टप्प्यात पुनर्वसित इमारतींची कामे वेगाने सुरू असून, जसजशा इमारती पूर्ण होत आहेत, तसतसा घरांचा ताबा रहिवाशांना दिला जात आहे.

पुनर्विकासाच्या दुसऱ्या टप्प्यातील कामांना गती देण्यासाठी रहिवाशांचे तात्पुरते स्थलांतर करून इमारती रिकाम्या करणे आवश्यक आहे. मात्र, मुंबई मंडळाकडे सध्या रहिवाशांच्या स्थलांतरासाठी संक्रमण शिबिरांतील पुरेसे गाळे उपलब्ध नाहीत. सध्या मंडळाकडे केवळ २,५०० गाळे उपलब्ध असून ते अपुरे आहेत. त्यामुळे इमारती रिकाम्या करून घेण्याचे मोठे आव्हान मंडळासमोर उभे राहिले होते. या समस्येवर तोडगा म्हणून रहिवाशांना घरभाड्याचा पर्याय उपलब्ध करून देण्यात आला आहे. या निर्णयानुसार रहिवाशांना दरमहा २५ हजार रुपये घरभाडे दिले जात होते. वरळी, नायगाव परिसरात घरभाडे आवाक्याबाहेर वरळी, ना. म. जोशी मार्ग आणि नायगाव परिसरातील घरभाड्याच्या तुलनेत ही रक्कम अपुरी ठरत होती. २५ हजार रुपयांत भाड्याने घरे उपलब्ध होत नसल्याने रहिवाशांच्या अडचणी वाढल्या होत्या. त्यामुळे घरभाड्याच्या रकमेत वाढ करण्याची मागणी तिन्ही चाळीतील रहिवाशांकडून सातत्याने केली जात होती.रहिवाशांच्या मागणीनुसार मुंबई मंडळाने घरभाडे वाढविण्याचा प्रस्ताव काही महिन्यांपूर्वी गृहनिर्माण विभागाकडे मान्यतेसाठी पाठविला होता. या प्रस्तावास गृहनिर्माण विभागाने मान्यता दिली आहे. या निर्णयानुसार आता रहिवाशांना दरमहा २५ हजार रुपयांऐवजी ३० हजार रुपये घरभाडे दिले जाणार आहे. राज्य सरकारच्या या निर्णयाचे ना. म. जोशी मार्ग बीडीडी पुनर्विकास समितीने स्वागत केले आहे.

### हिंजवडीत एनएसजी आणि अमेरिकन कमांडोंचे मॉकड्रिल; सायरनने उडाली खळबळ!

**पिंपरी/प्रतिनिधी :** हिंजवडी आयटी पार्कमध्ये भारतीय आणि अमेरिकेच्या विशेष सुरक्षा दलांचा संयुक्त सुरक्षा सराव पार पडला. अमेरिकेच्या १७ विशेष कमांडोंसह भारतीय नॅशनल सिक्युरिटी गार्डच्या (एनए-सजी) १०० हून अधिक 'ब्लॅक कॅट' कमांडोंनी या पाच तासांच्या मॉकड्रिलमध्ये सहभाग घेतला. जागतिक स्तरावरील आयटी हब म्हणून ओळखल्या जाणाऱ्या हिंजवडीच्या सुरक्षेचा आढावा घेण्यासाठी आयोजित केलेल्या या सरावात दहशतवादी हल्ला आणि संवेदनशील परिसर सुरक्षित करण्यासारख्या परिस्थितींचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले.

माण-हिंजवडी परिसरातील एका नामांकित आयटी कंपनीच्या आवारात सायरन वाजवत बुधवारी सायंकाळी विशेष सुरक्षा दलाचा ताफा दाखल झाला. अत्याधुनिक शस्त्रांनी सज्ज एनएसजीचे 'ब्लॅक कॅट' कमांडो आणि अमेरिकन विशेष कमांडो वाहनांतून उतरून नियोजित ठिकाणी पोहोचले. सुरुवातीला प्रत्यक्ष कारवाई सुरू झाल्याचा समज झाल्याने परिसरात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले.

मात्र, हा पूर्वनियोजित सुरक्षा सराव असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर कर्मचाऱ्यांनी सुटकेचा नि:श्वास सोडला.

हिंजवडी आयटी पार्कमध्ये देश-विदेशातील नामांकित आयटी कंपन्यांची कार्यालये असून, हजारो भारतीय आणि परदेशी कर्मचारी येथे कार्यरत आहेत. त्यामुळे राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने हा परिसर संवेदनशील मानला जातो. कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत सुरक्षा यंत्रणांचा प्रतिसाद, समन्वय आणि कार्यक्षमता तपासण्यासाठी अशा प्रकारचे मॉकड्रिल नियमितपणे आयोजित केले जातात.

अचानक झालेल्या या मोहिमेमुळे सुरुवातीला नागरिकांमध्ये उत्सुकता व आश्चर्य पाहायला मिळाले. मात्र, हे मॉकड्रिल असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर सर्वांनी सुटकेचा नि:श्वास सोडला. अचानक दहशतवादी हल्ला झाल्यास त्यास प्रतिकार करण्यासाठी काय कार्यपद्धती अवलंबविण्यात यावी. कशा प्रकारे कार्यवाही करावी, फर्स्ट रिस्पॉन्डर कोण असणार, आऊटडर कार्टन कोणी व कशापद्धतीने करावे, इतरत्र कॉर्डन कसे करावे, वाहतूक नियंत्रण कसे करावे, बॉम्ब शोधक व नाशक पथकाची कारवाई, दहशतवाद विरोधी पथकाची कारवाईबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

### ५ हजारात व्हायचा पोरींचा सौदा, पनवेलच्या लॉजवर देहविक्री रॅकेटचा पर्दाफाश, २ तरुणींची सुटका

**पनवेल/प्रतिनिधी :** पनवेल तालुक्यातील महामार्गालगत असलेल्या एका लॉजमध्ये पर्यटकांच्या नावाखाली अनैतिक देहविक्रीचा काळा धंदा सुरू होता. आरोपी मोबाईलवर महिलांचे फोटो दाखवून ग्राहकांकडून हजारो रुपये उकळत होते. मात्र, नवी मुंबई गुन्हे शाखेच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने सापळा रचून या रॅकेटचा पर्दाफाश झाला. पोलिसांनी बनावट ग्राहक पाठवून ही कारवाई केली. या प्रकरणी लॉज मॅनेजर, वेटर आणि दलालाला पोलिसांनी अटक केली आहे.

नवी मुंबई गुन्हे शाखेच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाला एक गोपनीय माहिती मिळाली होती. पनवेलमधील शिरढोण येथील 'हॉटेल क्रांतीवीर लॉजिंग

# गडचिरोलीतील पूल उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असतानाच बांधला गेला

## भाजपा प्रदेश मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी डागली तोफ

**मुंबई :** राष्ट्रवादी शरद पवार गटाचे काठावर पास झालेले आमदार रोहित पवार यांनी काल गडचिरोलीत एक पूल कोसळल्याबद्दल ट्विट करून आरोप केले आहेत. मात्र महाविकास आघाडी सरकारच्या काळात त्या पुलाच्या बांधकामाचा करारनामा २०२० मध्ये झाला, तेव्हा उद्धव ठाकरे मुख्यमंत्री होते. रोहित पवार, तुम्ही महाविकास आघाडी सरकारमध्ये सहभागी होतात. २०२२ मध्ये पुलाचे पूर्ण बांधकाम करण्यात आले. या काळात उद्धव ठाकरे मुख्यमंत्री होते, रोहित पवार सरकारचे घटक होते, आमदार होते. रोहित पवार यांनी दलालांचे, कंत्राटदारांचे सरकार म्हणून टीका केली. मात्र महाविकास आघाडीच्या काळात गडचिरोलीचा पूल बांधण्यात आल्याने या पुलाच्या बांधकामात उद्धव ठाकरे यांनी किती टक्केवारी घेतली याचे उत्तर द्यायला पाहिजे, अशा शब्दात भाजपा प्रदेश मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी गुरुवारी तोफ डागली. भाजपा प्रदेश कार्यालयातील पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

विधिमंडळ पक्ष आणि राजकीय पक्ष यात कोण श्रेष्ठ, हा प्रश्नच नाही. मूळ शिवसेना ही वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांची होती. उद्धव ठाकरे यांनी केवळ विधिमंडळ पक्षावर बोलण्याऐवजी 'माझ्या तमाम हिंदू बांधवांनो, भगिनींनो' हे म्हणायचे का सोडून दिले यावर आधी बोलावे. काँग्रेसच्या मांडीला मांडी लावून बसणार नाही. तशी वेळ आली तर माझे दुकान बंद करेन, हे बाळासाहेब ठाकरे यांचे विचार सोडून उद्धव ठाकरे आणि संजय राऊत काँग्रेसच्या मांडीला मांडी लावून बसले. मूळ शिवसेनेची अशी वैचारिक पडझड झाल्याने शिवसेना ही एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात पुढे मार्गक्रमण करत आहे. न्यायालयात काय निकाल लागायचा तो लागेल, पण एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनाच खरी असल्याचे महाराष्ट्रातील जनतेने स्पष्ट केले आहे, अशा शब्दात संजय राऊत यांचा समाचार घेतला.

संजय राऊतांसारखे वायफळ बडबड करण्यापेक्षा गप्प बसलेले कधीही चांगले, या शब्दात अमृताजी फडणवीस यांनी अतिशय व्यवस्थित घेतलेला समाचार योग्य असल्याचे सांगून श्री. बन म्हणाले, संजय राऊत, तुमच्या वायफळ बडबडीला लोक कंटाळलेले आहेत. तुम्ही उबाठा गट संपवण्यासाठी राहुल गांधींकडून किती कमिशनखोरी केली, हे एकदा महाराष्ट्राला सांगा. तुम्ही ज्या पद्धतीने शिवीगाळ करता, अश्लील भाषेत



लोकांवर टीका करता, हे महाराष्ट्र पाहत आहे. तुमच्यामुळे लोकशाही वाचली असती तर तुमच्या पक्षाची ही वेळ आली नसती. लोकशाहीमध्ये जनतेने तुम्हाला तुमची जागा दाखवली आहे.

उबाठा गट काँग्रेसमध्ये विलीन करण्याची संजय राऊतांची इच्छा

एकनाथजी शिंदे यांची शिवसेना ही बाळासाहेब ठाकरे यांची हिंदुत्वासाठी लढणारी शिवसेना असल्याने ती अन्य पक्षात विलीन होण्याचा प्रश्न येत नाही, असे निक्षून सांगत श्री. बन पुढे म्हणाले, आता उरलासुरला उबाठा गट काँग्रेसमध्ये विलीन करायचा का समाजवादी पार्टीत, याचीच चर्चा मातोश्रीवर सुरू आहे. राहुल गांधींची इच्छा आहे की संजय राऊत यांच्यासह उबाठा गटाने काँग्रेसमध्ये विलीन व्हावे. तर आदित्य ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांची आपला पक्ष समाजवादी पार्टीत विलीन करण्याची इच्छा आहे. त्यामुळे आता उद्धव ठाकरे समाजवादी पार्टीत उबाठा गट विलीन करतात की, संजय राऊत यांच्या सांगण्यावरून काँग्रेसमध्ये, याची वाट महाराष्ट्र पाहतोय.

## भाजपा नाही या पक्षात शिंदेंची शिवसेना होणार विलीन? संजय राऊतांनी थेट नाव घेतलं

**मुंबई/प्रतिनिधी :** सर्वोच्च न्यायालयाने शिवसेना हा पक्ष आणि धनुष्यबाण या पक्षचिन्हासंदर्भात बुधवारपासून सुनावणीला सुरुवात झालेली असतानाच आज सकाळी पत्रकारांशी संवाद साधताना उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेचे खासदार तथा पक्षप्रवक्ते संजय राऊत यांनी शिंदेंच्या शिवसेनेमध्ये चलबिचल सुरु झाली असल्याचा दावा केला आहे. शिंदेंच्या शिवसेनेमध्ये विलिनिकरणाची चर्चा सुरु असल्याचा दावा राऊतांनी केला आहे. एवढ्यावरच न थांबता राऊत यांनी शिंदेंच्या शिवसेनेकडून विलिनिकरणासाठी दोन पर्यायांची चाचपणी केली जात असल्याचाही दावा केलाय. भारतीय जनता पार्टीसोबतच विलिनिकरणासाठी शिंदे सेनेकडे अजून एक पर्याय असल्याचा दावा राऊतांकडून करण्यात आला आहे.

लोकशाहीवर दुरोगामी परिणाम

मूळ पक्ष फुटलेला नसल्याने शिवसेना पक्ष आणि चिन्ह आमच्याकडे राहील अशी बाजू आम्ही मांडली. आपल्यापुढे ऐतिहासिक खटला सुरु असल्याचं आणि या निर्णयाचा लोकशाहीवर दुरोगामी परिणाम होईल याची जाणीव कोर्टाला असल्याचं काल मला जाणवलं. त्यामुळे आम्ही निश्चिंत आहोत, असं राऊत यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना नमूद केलं आहे.

भाजपाबरोबरच शिंदे सेना या पक्षातही होऊ शकते विलीन

''आम्हाला खात्री आहे की ज्यांनी बेईमानी केली त्यांना आम्ही कायद्यानेच संपवू. माझी आजची माहिती अशी आहे की समोरच्या बाजूला चलबिचल सुरु झाली आहे. भारतीय जनता पार्टीमध्ये मर्ज व्हायचं की जो लहान पक्ष त्यांनी आपल्याच विलीन केलाय त्या 'प्रहार'मध्ये तृणमूलप्रमाणे विलीन व्हायचं त्यासंदर्भात त्यांच्याकडे खल सुरु आहे. लवकरच फुटीर गटाचे नेते दिल्लीला येतील आणि त्यांच्या पक्षाचे नेते अमित शाहांची चर्चा करतील,'' असं राऊत यांनी म्हटलं आहे.

## राज्यातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना दिलासा, न्यायालयाच्या आदेशानंतर शिक्षण विभागाचा मोठा निर्णय!

**पुणे/प्रतिनिधी :** राज्यातील खासगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळा, अध्यापक विद्यालये, विद्यानिकेतनांतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक मान्यता प्रकरणांमध्ये अधिकाऱ्यांकडून होणाऱ्या विलंबाला आता चाप लागण्याची चिन्हे आहेत. वैयक्तिक मान्यता प्रकरणांच्या मान्यता प्रक्रियेतील प्रत्येक टप्प्यासाठी आता शिक्षण विभागाने १५ दिवसांची कालमर्यादा घालून दिली असून, त्यानुसारच अधिकाऱ्यांना प्रकरणे हाताळावी लागणार आहेत.

मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात वैयक्तिक मान्यतांबाबत याचिका दाखल करण्यात आली होती. याचिकेप्रकरणी शिक्षकांच्या वैयक्तिक मान्यता, बदल्या, पदोन्नती आणि शालार्थ आयडी प्रदान करण्याबाबत स्पष्ट शासननिर्णय अस्तित्वात असूनही शिक्षणाधिकारी, शिक्षण उपसंचालकांकडून त्याचे पालन केले जात नसल्याचे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले होते. वैयक्तिक मान्यता प्रकरणांमध्ये संबंधित अधिकाऱ्यांकडून दिलेल्या कालमर्यादेत कार्यवाही होत नसल्याने न्यायालयीन प्रकरणांचे वाढते प्रमाण, औरंगाबाद खंडपीठाने नवीन शासननिर्णय प्रसिद्ध करण्याचा दिलेला आदेश या पार्श्वभूमीवर शिक्षण विभागाने नव्याने शासननिर्णय प्रसिद्ध करून स्पष्ट सूचना दिल्या आहेत.

नवीन नियमांनुसार, प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक स्तरावरील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक मान्यता प्रकरणातील प्रत्येक प्रक्रियेला १५ दिवसांची मुदत देण्यात आली आहे. शिक्षक किंवा शिक्षकेतर कर्मचाऱ्याच्या नियुक्तीनंतर संस्था किंवा व्यवस्थापनाला १५ दिवसांच्या आत वैयक्तिक मान्यतेचा प्रस्ताव संबंधित प्राथमिक किंवा माध्यमिक शिक्षणाधिकारी किंवा विभागीय शिक्षण उपसंचालकांकडे सादर करावा लागेल. प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर पुढील १५ दिवसांत अधिकाऱ्यांना छाननी करून त्यावर मंजुरी किंवा नामंजुरीचा निर्णय घ्यावा लागेल. प्रस्तावातील सर्व त्रुटी एकाच वेळी शैक्षणिक संस्थेला लेखी स्वरूपात १५ दिवसांत कळवाव्या लागणार आहेत. संबंधित संस्था किंवा व्यवस्थापनाला त्रुटींची पूर्तता करून १५ दिवसांच्या आत प्रस्ताव फेरसादर करावा लागेल. परिपूर्ण प्रस्ताव पुन्हा सादर झाल्यानंतर शिक्षणाधिकारी किंवा विभागीय उपसंचालक यांना पुढील १५ दिवसांच्या आत सुधारित वैयक्तिक मान्यतेबाबत मंजुरी किंवा नामंजुरीबाबतचा अंतिम निर्णय घ्यावा लागणार आहे, असे नमूद करण्यात आले आहे.शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक मान्यता प्रदान करण्यासंबंधीचे परिपूर्ण प्रस्ताव सादर केल्याच्या तारखेपासून दिलेल्या मुदतीपेक्षा जास्त काळ प्रस्ताव प्रलंबित राहणार नाहीत, याची दक्षता संबंधित अधिकाऱ्यांनी घ्यावी. पुरेशा कारणांशिवाय दिलेल्या मुदतीत अशा प्रस्तावांवर निर्णय घेणे शक्य नसल्यास संबंधित अधिकाऱ्यांनी विलंबाची लेखी कारणे नोंदवून वरिष्ठ कार्यालयाला कळवावीत, तसेच वैयक्तिक मान्यतांच्या थकीत किंवा सादर प्रकरणांचा मासिक आढावा एकस्तर अधिकाऱ्यांनी घ्यावा, दर तीन महिन्यांतून एकदा किमान २५ टक्के वैयक्तिक मान्यता प्रकरणांची प्रत्यक्ष तपासणी करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.'पवित्र' प्रणालीद्वारे नियुक्त होणाऱ्या शिक्षक, कर्मचाऱ्यांना स्वतंत्र वैयक्तिक मान्यतेची कोणतीही आवश्यकता राहणार नाही, असेही यात स्पष्ट करण्यात आले आहे.

## ज्येष्ठ साहित्यिक श्रीनिवास कुलकर्णी यांचे निधन

**पुणे/प्रतिनिधी :** डोह, सोन्याचा पिंपळ आणि कोरडी भिक्षा यांसारख्या साहित्यकृतींना वाचकांच्या मनात घर करून राहिलेले ज्येष्ठ साहित्यिक श्रीनिवास विनायक कुलकर्णी (वय ९१) यांचे गुरुवारी दुपारी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यामागे पत्नी, दोन मुलगे, सुना आणि नातवंडे असा परिवार आहे. फेब्रुवारीमध्ये खुब्याचे हाड मोडल्याच्या त्रासातून ते बरे झाले होते. पण, त्यानंतर त्यांची प्रकृती क्षीण होत गेली. गुरुवारी दुपारी दोनच्या सुमारास निवासस्थानी त्यांची प्राणज्योत मालवली. कराड येथे सायंकाळी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. 'डोह', 'सोन्याचा पिंपळ', 'पाण्याचे पंख' आणि 'कोरडी भिक्षा' यांसारख्या साहित्यकृतींतून ललित लेखनाची 'मौज' अनुभवताना वाचकांना समृद्ध करण्याचे काम श्रीनिवास विनायक कुलकर्णी यांनी केले.

अर्धशतकाहून अधिककाळ साहित्यसेवा करणारे व्रतस्थ लेखक काळाच्या पडद्याआड गेले आहेत.. श्रीनिवास कुलकर्णी यांचे लेखन महाराष्ट्रापुरतेच मर्यादित न राहता धारवाड आणि कोलकतापर्यंत पोहोचले असून त्यांच्या साहित्याचा इंग्रजी अनुवाद झाला आहे.

सांगली जिल्ह्यातील औदुंबर या गावी जन्म झालेल्या श्रीनिवास यांचे प्राथमिक शिक्षण औदुंबरमध्येच झाले, तर सातवीपर्यतचे शिक्षण अंकलखोप येथे झाले. त्यापुढील शिक्षण सांगलीच्या



'अनाथ विद्यार्थी आश्रम' या संस्थेत राहून पूर्ण केले. त्यांचे आजोबा व वडील दोघेही चित्रकार होते. या दोघांच्या सान्निध्यात होणारे कलेचे संस्कार आणि औदुंबरच्या परिसराच्या वातावरणाचा परिणाम यांमधून श्रीनिवास कुलकर्णी यांचे संस्कारशील, संवेदनक्षम मन तयार झाले. शिक्षण संपल्यावर प्रथम दोन वर्षे साइन बोर्ड पेंटिंगचा व्यवसाय व नंतर ओगलेवाडी येथील काचकारखान्यात हिशेब खात्यात नोकरी. त्यानंतर 'मौज' या नियतकालिकाच्या संपादन विभागात त्यांनी काम केले. कवितेवर आत्यंतिक प्रेम असलेल्या श्रीनिवास कुलकर्णी यांची पहिली कविता मराठी चौथीत असताना पां. ना. मिसाळ यांच्या 'बालसन्मित्र' मध्ये प्रसिद्ध झाली होती. पहिली गोष्ट का. रा. पालवणकरांच्या 'खेळगडी'च्या शेवटच्या बाललेखांकात प्रसिद्ध झाली. 'बालकवींच्या प्रतिभेने कविता न लिहिता गद्य लिहिले असते तर ते लेखन श्रीनिवास कुलकर्णी यांचेच झाले असते', अशा शब्दांत मंगेश पाडगावकर यांनी कुलकर्णी यांच्या लेखनाचे मोल उलगडले. 'मनातल्या उन्हात' हा त्यांचा ललित लेख १९६० मध्ये 'सत्यकथे'त प्रसिद्ध झाला. त्यांचे सर्व लेख प्रथम 'सत्यकथा' आणि 'मौज' या नियतकालिकांमधून प्रसिद्ध झाले. 'पाण्याचे पंख' या संग्रहात त्यांनी घरात आणि सभोवती असणाऱ्या, वावरणाऱ्या लहान मुलांचे भावविश्व साकारले आहे. अलोक, पदम, मनू, मिकी या लहान मुलांचे हसणे, खेळणे, बागडणे हे लेखकाच्या नजरेतून टिपताना आपल्या सभोवतालच्या लहान मुलांच्या जगाशी त्यांचे नाते जुळलेले दिसते. 'कोरडी भिक्षा' या संग्रहातील व्यक्तिचित्रांच्या चित्रणातून पुन्हा वेगळे अनुभव वाचकांसमोर उलगडतात.

त्यांच्या सर्व लेखनाला चित्रदर्शी शब्दकलेची जोड लाभली आहे. चित्रकलेच्या संस्कारातून येणारी दृश्यमयता, निसर्गाच्या सूक्ष्म निरीक्षणामधून वर्णनात येणारा बारकावा आणि अनुभवाचा तळ गाठणारी पारदर्शी लेखनशैली यांमुळे कुलकर्णी यांच्या लेखांमधील आशय एक वेगळीच उंची गाठतो. ललित लेखनाला एक वेगळेच परिमाण देऊन हे लेखन समृद्ध करणारा लेखक म्हणून श्रीनिवास विनायक कुलकर्णी यांचे नाव निश्चितच अग्रक्रमाने घ्यावे लागेल.

अशा सारस्वताला महाराष्ट्र फाउंडेशनच्या वतीने यापूर्वी साहित्य पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. राज्य सरकारच्या 'विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कारा'ने कुलकर्णी यांच्या शिपरेचात मानाचा तुरा खोवला गेला होता.

# राजपाल यादव आर्थिक संकटात? चेक बाउन्स प्रकरणात अडचणी वाढल्या

**मुंबई/प्रतिनिधी :** बॉलिवूड अभिनेता राजपाल यादव याच्या अडचणी थांबण्याचं नावच घेईनात. चेक बाउन्स प्रकरणात आता राजपाल यादव याच्या प्रॉपर्टीचा लिलाव होणार आहे. १० जुलै रोजी चेक बाउन्स प्रकरणात दिल्ली उच्च न्यायालयानं त्यांना दोषी ठरवून कारावासाची शिक्षा सुनावलेली. अशातच आता अभिनेत्याला मोठा धक्का बसला असून प्रॉपर्टीचा लिलाव केला जाणार आहे. तशी नोटीसही अभिनेत्याला देण्यात आलीय.

१६ कोटी रुपयांचं कर्ज न फेडल्यामुळे 'सेंट्रल बँक ऑफ इंडिया'कडून राजपाल यादव यांच्या दोन मालमत्तांचा लिलाव केला जाणार आहे. ज्या मालमत्तांचा लिलाव होणार आहे, त्या बँकेकडून कर्ज घेताना अभिनेत्यानं गहाण ठेवलेल्या. आता या दोन्ही मालमत्तांचा ताबा बँकेनं घेतला असून त्यांचा लिलाव



९ सप्टेंबर रोजी होणार आहे.

राजपाल यादव यांच्या ज्या दोन मालमत्तांचा लिलाव केला जातोय, त्यापैकी एक शाहजहांपूरमधील 'कचहरी रोड'वर आहे, तर दुसरी वांद्रे आणि वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स परिसरात आहे. राजपाल यादव यांनी आपली पत्नी राधा यादव आणि आई गोदावरी यांच्या नावावर सेंट्रल बँकेच्या मुंबई शाखेकडून १६.६१ कोटी रुपयांचं कर्ज घेतलं होतं, पण कर्ज वेळेवर परत करण्यात ते अपयशी ठरले. दोन वर्षांपूर्वी बँकेनं यासंदर्भात एक नोटीस लावली होती आणि त्यानंतर कर्ज परतफेडीबाबत चर्चा झालेली.

मीडिया रिपोर्टनुसार, हे प्रकरण २०१२ मधील 'अता पता लापता' सिनेमांशी संबंधित आहे, ज्याचं दिग्दर्शन खुद्द राजपाल यादव यांनीच केलं होतं. या सिनेमासाठी 'सेंट्रल बँक ऑफ इंडिया'कडून कर्ज घेण्यात आलं होतं. हा सिनेमा बॉक्स ऑफिसवर दणकून आपटला आणि अभिनेत्याला कर्जाची परतफेड करता आली नाही. कालांतरानं त्यावर व्याज वाढत गेलं आणि आता एकूण थकीत रकमेचा आकडा १६ कोटी रुपयांच्याही पुढे गेला आहे.प्रॉपर्टीच्या लिलावावर राजपाल यादव यांची कोणतीही प्रतिक्रिया समोर आलेली नाही. तर, त्याचा मोठा भाऊ श्रीपाल यादव यांनी सांगितलंय की, कर्जाचं प्रकरण खूप जुनं आहे आणि बँकेसोबत सेटलमेंटची चर्चा सुरू आहे.

२०१० मध्ये राजपाल यादव यांनी त्यांच्या निर्मितीतील 'अता पता लापता' या सिनेमासाठी सुमारे ५ कोटी रुपयांचं कर्ज घेतलं होतं. मात्र सिनेमा बॉक्स ऑफिसवर अपयशी ठरल्यानंतर ते कर्जाची वेळेत परतफेड करू शकले नाहीत. त्यानंतर दिलेले अनेक चेक बाऊन्स झाल्यानं त्यांच्याविरोधात न्यायालयीन लढाई सुरू झाली. यापूर्वीही या प्रकरणात राजपाल यादव यांना तुरुंगवास भोगावा लागला होता.

त्यानंतर त्यांनी अनेक वेळा थकबाकी फेडण्याचं आश्वासन दिलेलं. मात्र ती आश्वासनं पूर्ण न झाल्यानं अखेर दिल्ली उच्च न्यायालयानं दोषसिद्धी कायम ठेवत तीन महिन्यांच्या कारावासाचा निर्णय कायम ठेवला आहे. अशातच अजूनही राजपाल यादव यांनी पूर्ण कर्जाची परतफेड न केल्यानं आता त्यांच्या प्रॉपर्टीचा लिलाव केला जाणार आहे.

# औसा ग्रामीण रुग्णालयाचा ‘कमाल’ पराक्रम; गुंतागुंतीची जुळ्या बाळांची नॉर्मल प्रसूती यशस्वी

## डॉक्टर-परिचारिकांच्या जिद्दीला यश; औशात जुळ्या बाळांचा सुरक्षित जन्म, आईसह दोघेही सुखरूप

**औसा/प्रतिनिधी :** मर्यादित सुविधा असतानाही उत्कृष्ट वैद्यकीय सेवा देत औसा येथील ग्रामीण रुग्णालयाने पुन्हा एकदा आपली कार्यक्षमता सिद्ध केली आहे. अत्यंत गुंतागुंतीच्या जुळ्या गर्भधारणेची प्रसूती शस्त्रक्रिया न करता सामान्य पद्धतीने यशस्वीरीत्या पार पाडण्यात वैद्यकीय अधिकारी आणि परिचारिका यांच्या पथकाला यश आले. आईसह दोन्ही नवजात बाळांची प्रकृती उत्तम असून या कामगिरीबद्दल सर्व स्तरांतून ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय पथकाचे कौतुक होत आहे.

तस्लिम माजीद शेख (वय २७) या महिलेला गुरुवारी (दि. ६ ऑगस्ट) दुपारी १२.१० वाजता प्रसूतीसाठी औसा ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्राथमिक तपासणीदरम्यान संबंधित



महिला जुळ्या गर्भाची आई असल्याचे तसेच प्रसूती अत्यंत गुंतागुंतीची असल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आले. परिस्थितीची गंभीरता लक्षात घेऊन रुग्णाच्या नातेवाईकांना संपूर्ण माहिती देण्यात आली. त्यांची संमती घेतल्यानंतर रुग्णालयातील अनुभवी वैद्यकीय पथकाने सामान्य प्रसूती करण्याचा निर्णय घेतला.

यानंतर डॉक्टर आणि अधिपरिचारिका यांनी समन्वय, संयम आणि कौशल्याच्या बळावर ही आव्हानात्मक प्रसूती यशस्वीरित्या पूर्ण केली. प्रसूतीनंतर दोन गोंडस मुलांचा जन्म झाला. दोन्ही नवजात अर्भकांचे वजन प्रत्येकी दोन किलो असून आई आणि दोन्ही बाळांची प्रकृती उत्तम असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली. तिघांच्याही जीविताला कोणताही धोका नसल्याने कुटुंबीयांनी सुटकेचा निःश्वास सोडला. यशस्वी उपचाराबद्दल त्यांनी संपूर्ण वैद्यकीय पथकाचे आभार मानले.

या यशस्वी प्रसूतीसाठी वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुनिता पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. प्रभारी परिसेविका श्रीमती अर्चना सगर, श्रीमती चांदणी मोरे, श्रीमती हमीदा राठोडे यांच्यासह कर्तव्यावरील डॉ. सायली कापसे, अधिपरिचारिका श्रीमती कावेरी भोसले आणि श्रीमती योगेश्वरी जाधव यांनी अथक परिश्रम घेत ही गुंतागुंतीची प्रसूती सामान्य पद्धतीने यशस्वी केली.

रुग्णालयातील एनसीडी विभागाचे श्री. अतुल कांबळे यांनी या यशस्वी कार्याची माहिती देत संपूर्ण वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले. यावेळी वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुनिता पाटील यांनी भविष्यात ग्रामीण रुग्णालयाचे १०० खाटांच्या रुग्णालयात रूपांतर झाल्यानंतरही याच सेवाभावी वृत्तीने, तितक्याच जिद्दीने आणि गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा देण्यासाठी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सज्ज राहावे, असे आवाहन केले.

मर्यादित साधनसामग्रीतही अशा प्रकारची गुंतागुंतीची प्रसूती यशस्वीरीत्या पार पडल्याने औसा ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय सेवेला नवी ओळख मिळाली असून परिसरातून डॉक्टर व कर्मचाऱ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## चिंचोली माळी येथील विविध समस्यावर वारंवार पाठपुरावा करून देखील कार्यवाही होत नाही-विठ्ठल झाडे

### १५ ऑगस्ट रोजी आत्मदहन करण्याचा प्रशासनाला इशारा!



**केज/प्रतिनिधी :** केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील विविध समस्यावर वारंवार पाठपुरावा करून देखील कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही.जर प्रशासनाने१५ ऑगस्ट २०२६ रोजीच्या अगोदर मागणी केलेल्या प्रमाणे कामे मार्गी लावली नाहीत. तर १५ऑगस्ट स्वातंत्र्य दिनाच्या दिवशी चिंचोली माळी गावात किंवा केज तहसील कार्यालयाच्या परिसरात अन्यथा कोठेही आत्मदहन करणार आहे. असा इशारा विठ्ठल विनायक झाडे यांनी लेखी निवेदनाद्वारे केज तहसीलदार यांना दिला आहे.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की, केज तालुक्यातील चिंचोली माळी येथे तीन ते चार वर्षापासून प्राथमिक आरोग्य केंद्राची नवीन इमारत बांधकाम पूर्ण तयार असून त्यामध्ये जिल्हा परिषद बांधकाम विभागाकडून अनियमित्ता झाली असल्यामुळे संबंधित इमारत ही आरोग्य विभागाकडे वापरासाठी हस्तांतरित करण्यात आलेली नाही. त्याचबरोबर जुनी इमारत पूर्णपणे मोडकळीस आल्यामुळे रुग्णांची प्रचंड गैरसोय होत आहे. त्या संदर्भाने विठ्ठल झाडे यांनी दिनांक एप्रिल २०२६ रोजी जिल्हाधिकारी बीड यांना रेसर निवेदन दिलेले आहे परंतु आज रोजी पर्यंत सदरील नवीन इमारत ही हस्तांतरित करण्यात आलेली नाही. तसेच चिंचोली माळी येथील राज्य रस्ता मार्ग क्रमांक ६४ ते लाखा या कामाचे कार्यारंभ आदेश दिनांक १५/१०/२०२४ रोजी झालेला आहे. परंतु हे काम अत्यंत संथ गतीने सुरू आहे. त्यामुळे राज्य महामार्ग क्रमांक ६४ ते संत नामदेव महाराज मंदिरापर्यंत रस्तेची अत्यंत बिकट अवस्था झालेली आहे. सध्या पावसाळ्यामुळे या रस्त्यावरून अनेक वय वृद्ध नागरिक व शाळेत जाणारे विद्यार्थी हे या रस्त्यावरून पाय घसरून पडून त्यांना दुखापत झालेली आहे. विठ्ठल झाडे यांनी संबंधित गुत्तेदार व संबंधित अधिकाऱ्यांशी मागील वर्षापासून वारंवार एवढा रस्ता तात्काळ दुरुस्त करून द्या अशी विनंती करून मागणी लावून धरली असता अद्यापही संबंधित अधिकारी व गुत्तेदारांनी काम पूर्ण केले नाही. या रस्त्यावरून विद्यार्थी नागरिकांना जाता येता येत नाही. संबंधितांना सदर काम करण्यासाठी विनंती केली परंतु अद्याप पर्यंत काहीही काम केलेलं नाही याउलट मागील वर्षी गुत्तेदारांनी टाकलेली खडी ही सरपंच पती यांनी उचलून नेहली आहे. येत्या १२ ऑगस्ट २०२६ पर्यंत प्राथमिक आरोग्य केंद्राची नवीन इमारत व राज्य मार्ग क्रमांक ६४ ते संत नामदेव महाराज मंदिरापर्यंतच्या रस्त्याचे काम पूर्ण न झाल्यास दिनांक १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्य दिनी विठ्ठल झाडे हे चिंचोली माळी गावात किंवा केज तहसील कार्यालय परिसरात अथवा इतर कोठेही आत्मदहन करणार आहेत. अशा आशयाचे लेखी निवेदन तहसीलदार केज यांना त्यांनी दिले आहे.

## शिवश्री व्हिजन केअर सेंटरचा शुभारंभ उत्साहात; समाजसेवेच्या नव्या पर्वाला प्रारंभ

**लातूर :** शिवश्री फाउंडेशन, लातूर संचलित दृष्टी रक्षा प्रकल्प अंतर्गत शिवश्री व्हिजन केअर सेंटर या महत्त्वाकांक्षी उपक्रमाचा शुभारंभ सोमवारी उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. समाजातील प्रत्येक गरजू व्यक्तीला दर्जेदार नेत्रसेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून स्वागत होत आहे .

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस बबन (आबा) भोसले हे तर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच प्रमुख उपस्थिती म्हणून जिल्हा परिषदेचे आरोग्य सभापती जानेश्वर बिराजदार, काँग्रेस चे माजी जिल्हाध्यक्ष श्रीशैल उटगे, सुधीर पितदार, शअमर पाटील, बाळाजी गोटके, वेताळेश्वर बाबगे, विलास उफाडे यांच्यासह विविध राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतात शिवश्री फाउंडेशनने समाजहितासाठी हाती घेतलेला हा उपक्रम अत्यंत कौतुकास्पद असून, भविष्यात हजारो गरजू नागरिकांच्या जीवनात प्रकाश निर्माण करणारा ठरेल, असा विश्वास व्यक्त केला. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत नेत्रसेवा पोहोचविण्याच्या कार्यासाठी फाउंडेशनला शुभेच्छा देत सर्वांनी पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. प्रारंभी फाउंडेशनचे अध्यक्ष उल्हास डोलारे यांनी प्रास्ताविक केले.यावेळी उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुछ देऊन स्वागत करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उपाध्यक्ष अविनाश टेळे पाटील,कृष्णा पवार, गौरीशंकर माकणे, शैलेश कुमदाळे, किरण कुलकर्णी, अमोल सागर यांच्यासह फाउंडेशनच्या सर्व संचालक मंडळानी परिश्रम घेतले.

सेवा हीच खरी ईश्वरसेवा असून गरजूंच्या डोळ्यांतील प्रकाश जपण्याचे कार्य हे सर्वात मोठे सामाजिक योगदान आहे. शिवश्री फाउंडेशनने आरोग्य, शिक्षण आणि समाजसेवा या क्षेत्रात सातत्याने केलेल्या कार्याचेही उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित मान्यवरांचे आभार मानण्यात आले. यावेळी अनेकांचे डोळे तपासून त्यांना मोफत चष्म्याचे वाटप करण्यात आले.गरजूंच्या डोळ्यांत प्रकाश फुलविण्याचा संकल्प अधिक जोमाने पुढे नेऊ, असा निर्धार व्यक्त करत कार्यक्रमाची सांगता झाली.

## श्रीकिशन सोमाणी विद्यालयाचे २० विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेच्या गुणवत्ता यादीत झळकले



**लातूर/प्रतिनिधी :** येथील अभिनव मानव विकास संस्थाद्वारा संचलित श्रीकिशन सोमाणी विद्यालयाच्या एकूण २० विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने घेण्यात आलेल्या प्राथमिक व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेच्या गुणवत्ता यादीत झळकले आहेत.

इयत्ता चौथी (प्राथमिक )च्या विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या या परीक्षेत एकूण तेरा विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीत स्थान मिळवले आहे. यशस्वी विद्यार्थ्यांत कु. गीता विष्णू जगळपुरे ( २५६), कु. अक्षरा संभाजी वाळके (२४४),आदर्श महेश जगळपुरे (२३६), प्रथमेश शंकर सुडे (२३६), कु. पद्मश्री परमेश्वर पाटील (२३०), कु. अनन्या संतोष मरे (२२२), कु. श्रेया रत्नेश्वर सिंघन (२१२), तेजस वैजनाथ उकरडे (२०४), कु.ईश्वरी संगमेश्वर चौधरी (१९८) , शिवांश संतोष कदम१९६), कु. श्रेया परमेश्वर मुळे (१९४), कु. ऋतिका शाहूराज भोसले (१९२) व कु. अक्षता भीमाशंकर गोडमपल्ले (१९० ) यांचा समावेश आहे. इयत्ता सातवी (उच्च प्राथमिक) च्या गुणवत्ता यादीत झळकलेल्या यशस्वी विद्यार्थ्यांत माऊली महेश जगळपुरे ( २६४), पियुष प्रवीण पोलावार ( २००),कु.अनुष्का मुकेश सोनवणे ( २००), कु.अनन्या नवनाथ सिंगापूरे (२००), विराट अरुण आकडे ( २०२), हर्षवर्धन हनमंत बिदादा ( १९८) व श्री संतोष केंद्रे (१९०) यांचा समावेश आहे.

श्रीकिशन सोमाणी विद्यालयाच्या एकूण २० विद्यार्थ्यांनी प्राथमिक व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत संपादन केलेल्या या नेत्रदीपक यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. चेतन सारडा, सचिव कमलकिशोर अग्रवाल, शालेय समितीचे अध्यक्ष अतुल देऊळगावकर, कोषाध्यक्ष जयेश बजाज, मुख्याध्यापक रमाकांत स्वामी, पर्यवेक्षक गिरीश कुलकर्णी, सुनीता जाधव, राहुल पांचाळ यांसह सर्व शिक्षक - शिक्षिका - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

## बाबुरावजी आडसकर महाविद्यालयाचे डॉ. बी.जे.हिरवे यांच्या मायक्रोबायोम तपासणी पेटेंटला भारत सरकारची मान्यता





**केज/प्रतिनिधी :** केज येथील बाबुरावजी आडसकर वरिष्ठ महाविद्यालयातील वनस्पती शास्त्र विषयाचे सहयोगी प्राध्यापक डॉ.बाबासाहेब जालिंदरराव हिरवे यांना भारत सरकारच्या पेटेंट कार्यालयाने त्यांनी सादर केलेल्या मायक्रोबायोम निरीक्षक यंत्र प्रणालीसाठी दिनांक ३० जुलै २०२६ रोजी मान्यता दिली आहे.त्यांनी हे संशोधन दिनांक २४ जानेवारी २०२६ रोजी सादर केले होते.

या संशोधनामुळे पाण्यातील सूक्ष्मजीवांचे निरिक्षण झाल्यामुळे पाण्यातील जिवाणू, विषाणू,शेवाळ इत्यादी घटकांची तपासणी हे यंत्र करणार आहे.त्या मुळे दुषित पाण्यामुळे होणाऱ्या मानवी रोगांवर नियंत्रण होणार आहे.

हे संशोधन संत गाडगे महाराज महाविद्यालय, गिरगांव,मुंबई येथील प्राचार्य डॉ.वसंत माळी, डॉ. बाबासाहेब हिरवे (केज) डॉ.अमोल पाटील, डॉ. सुषमा सुर्वे (कोहिनूर महाविद्यालय, खुल्ताबाद), डॉ.मिलिंद जमदाडे यांच्या संयुक्त प्रयत्नातून पुर्ण झाले आहे. त्यांच्या या नेत्रदीपक यशाबद्दल अंबाजोगाई सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन तथा छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेचे सचिव रमेशराव आडसकर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजी नगर च्या व्यवस्थापन परिषदेच्या सदस्या सौ.अर्चनाताई आडसकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अनिल किर्दंत,, ग्रंथालय विभाग प्रमुख डॉ.आशा बोबडे, कार्यालयीन अधीक्षक पी.एस.भोसले,डी.एस.यादव, डॉ.प्रकाश खुळे, डॉ.अनिल गायकवाड व सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन व कौतुक केले आहे.

## १ लाखांहून अधिक अमराठी चालकांनी गिरवले व्यवहारिक मराठीचे धडे – मंत्री प्रताप सरनाईक

**मुंबई । प्रतिनिधी :** महाराष्ट्रात रोजगार करायचा असेल, तर मराठीशी नाळ जोडलीच पाहिजे. ही सक्तीची नव्हे, तर आपुलकीची भाषा आहे. प्रवाशांशी दोन प्रेमाचे शब्द मराठीत बोलणारा प्रत्येक चालक हा महाराष्ट्राच्या संस्कृतीचा सन्मान करणारा दूत ठरतो,'' अशा भावनिक शब्दांत परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे मराठी शिकवणी अभियानाला' मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाबद्दल समाधान व्यक्त केले. या अभियानाअंतर्गत राज्यभरातील १ लाखांहून अधिक अमराठी व्यावसायिक प्रवासी वाहन चालकांनी व्यवहारिक मराठीचे धडे यशस्वीरित्या पूर्ण केले असून, उर्वरित चालकांनीही १५ ऑगस्टपूर्वी या संधीचा लाभ घेऊन मराठी शिकावे, असे आवाहन त्यांनी केले.

या अभियानाच्या आढावा बैठकीस परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर, ज्येष्ठ साहित्यिक प्रदीप ढवळ, मुंबई मराठी साहित्य संघ तसेच कोकण मराठी साहित्य परिषदेचे प्रतिनिधी उपस्थित होते. मंत्री सरनाईक म्हणाले, ''मराठी ही केवळ संवादाची भाषा नसून महाराष्ट्राच्या अस्मितेचा आणि संस्कृतीचा आत्मा आहे. येथे उपजीविका करणाऱ्या प्रत्येकाने मराठीचा सन्मान करावा, हा आमचा प्रामाणिक आग्रह आहे.

# विलास कारखान्याला सर्वोत्कृष्ट सहकारी साखर कारखाना पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल, चेअरमन वैशाली विलासराव देशमुख यांचा सत्कार

## पंचायत समिती सभापती, उपसभापती व पदाधिकाऱ्यांकडून सर्व संचालकांचे अभिनंदन

**लातूर/प्रतिनिधी :** सहकार आणि साखर उद्योगात आपल्या उत्कृष्ट कामगिरीचा ठसा उमटवणाऱ्या वैशालीनगर, निवळी (लातूर) येथील विलास सहकारी साखर कारखान्यास डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशन-इंडिया, पुणे यांच्या वतीने ‘‘सर्वोत्कृष्ट सहकारी साखर कारखाना - २०२६‘‘ हा मानाचा विशेष पुरस्कार जाहीर झाला आहे. या दैदिप्यमान यशाबद्दल पंचायत समितीच्या लोकप्रतिनिधींनी विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन वैशाली विलासराव देशमुख यांची बाभळगाव निवासस्थानी भेट घेऊन त्यांचा सत्कार केला व सर्व संचालक मंडळाचे अभिनंदन केले.



या सत्कार प्रसंगी पंचायत समितीचे सभापती श्रीकांत बैले, उपसभापती महेश चव्हाण आणि सदस्य गुरुनाथ गवळी, सौ. तनुजा चव्हाण, सौ. प्रिया उफाडे, सौ. पूजा जाधव, सौ. शिवानी शिंदे, सत्यनारायण पाटील, श्रीकांत बैले, विलास उफाडे, बाळासाहेब कदम, सौ. दिपाली कराड, अंशकित गायकवाड, अमोल देडे, सौ. सुनंदा स्वामी, सौ. पूजा ढगे, गणेश ढगे, अनिल कराड, जनक गायकवाड सर, भास्कर शिंदे, नितीन जाधव, बापूसाहेब चव्हाण, नामदेव उफाडे यांच्यासह विविध पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लोकनेते विलासराव देशमुख यांच्या प्रेरणेतून उभा राहिलेला विलास कारखाना सहकार महर्षी, माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या कुशल नियोजनानुसार तसेच माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख, लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमन धिरज विलासराव देशमुख आणि कारखान्याच्या चेअरमन वैशाली विलासराव देशमुख यांच्या सक्षम मार्गदर्शनाखाली कारखान्याला आजपर्यंत सहकार आणि साखर उद्योगाशी निगडित राज्य व राष्ट्रीय पातळीवरील तब्बल ३८ पुरस्कार मिळाले असून, या पुरस्काराने त्यात आणखी एका मानाच्या शिरपेचाची भर पडली आहे.

यावेळी चेअरमन वैशाली विलासराव देशमुख यांनी पंचायत समितीच्या पदाधिकाऱ्यांनी केलेल्या सत्कारा बद्दल सर्व लोकप्रतिनिधींचे मनापासून आभार मानले.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.